पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **०५**

**सभावृत्तांत**

दिनांक - **१३/०१/२०२२** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा गुरुवार, दिनांक **१३/०१/२०२२** रोजी **दु.२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांचे दालनात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जानेवरी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा. सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

**१. मा.सविता बाळकृष्ण खुळे - सभापती**
२. मा. गायकवाड निर्मला मनोज
३. मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
४. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा. उल्हास जगताप - नगरसचिव, मा. सुहास बहाद्दरपुरे - समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.३) शहरातील महिलांचा शारीरिक व मानसिक विकास होणेकरीता “योगाचे प्रशिक्षण” देणे बाबत.

मा.निर्मला गायकवाड व मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

----------

अ) मा. महिला व बालकल्याण समिती सभा (कार्यपत्रिका क्रमांक **०४**) दिनांक २३/१२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - १३ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १३/०१/२०२२ विभाग-नागरवस्ती विकास योजना

सुचक - मा.निर्मला गायकवाड अनुमोदक - मा.रेखा दर्शले

संदर्भ - मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नाावियो/०६/कावि/१५४/२०२१, दि.२७/१२/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे अनेक कुटूंबातील कर्त्या पुरुषाचे निधन झाल्यामुळे अनेक महिला विधवा झाल्या असून, अशा महिलांच्या कुटूंबीयांवर उपासमारीची वेळ येत आहे. या कुटूंबीयांवर अचानक आलेल्या संकटामुळे त्यांची आर्थिक स्थिती खालावली असून, त्यांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागत आहे. तसेच लॉकडाऊनच्या काळात अनेकांनी नोक-या गमवल्या असून, हातावर पोट असणाऱ्या कष्टकरी वर्गाला आर्थिक समस्या अद्यापही भेडसावत आहेत. अशा स्थितीत पिंपरी चिंचवड शहरातील गरीब, गरजू महिला/युवती यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी त्यांना नामांकित संस्थांकडून कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्यास त्यांच्या बेरोजगारीचा प्रश्न सुटू शकेल. याकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत दिनांक ३०.८.२०२१ ते दिनांक २.९.२०२१ या कालावधीत महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय स्तरावर **“उमेद जागर”** या उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यक्रमात कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे विधवा झालेल्या महिलांना बोलविण्यात आलेले होते. यामध्ये एकूण ४०९ विधवा महिलांनी सहभाग नोंदविला होता. या ४०९ विधवा महिलांची माहीती संकलीत करण्यात आलेली असून, यामध्ये काही महिलांनी त्यांना अथवा त्यांचे मुला / मुलींकरता रोजगार किंवा कौशल्य प्रशिक्षणाची आवश्यकता असल्याची बाब नमूद केलेली होती. त्या अनुषंगाने, विविध रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षण देणा-या संस्थांशी संपर्क साधण्यात आलेला होता. त्यापैकी सिम्बायोसीस ओपन एज्युकेशन सोसायटी या संस्थेने संबंधित महिला व त्यांच्या मुली/ मुलांकरीता कौशल्य प्रशिक्षण देण्यासंदर्भात संमती दर्शविली असून, सिम्बॉयसिस ओपन ॲज्युकेशन सोसायटीचे प्रतिनिधी व मनपाकडील विविध अधिकारी यांचे दरम्यान वेळोवेळी चर्चा करून,

त्यानुसार कोर्सेसची निश्चिती करण्यात आलेली असून, त्याबाबत त्यांनी दिनांक ०१/१०/२०२१ रोजीच्या इ-मेल द्वारे मनपा हद्दीमधील कोविड १९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे विधवा झालेल्या महिलांना व त्यांच्या मुलां / मुलींना देण्यात येणा-या कौशल्य प्रशिक्षण कोर्सेस यादी, कोर्स कालावधी, शैक्षणिक अर्हता, वयोगट, कोर्स फी (+ अतिरिक्त कर) व अन्य माहिती सादर केलेली असून, सदर कोर्सेसेबाबतचा सविस्तर तपशिल सोबतच्या प्रपत्रामध्ये नमूद करण्यात आलेला आहे. कृपया त्याचे अवलोकन होणेस विनंती. सिम्बॉयसिस ओपन ऍज्युकेशन सोसायटीकडीलप्रस्तावात नमूद केलेनुसार कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे विधवा झालेल्या ४०९ महिला व त्यांच्या मुलां / मुलींकरीता रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहे. यामधील महिलांच्या व त्यांच्या मुलींच्या कौशल्य प्रशिक्षणाच्या शुल्काची / खर्चाची रक्कम + अतिरिक्त कर असे एकूण रक्कम ही महापालिका अंदाजपत्रकातील महिला व बाल कल्याण योजनेच्या पंडित दिनदयाळ उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम या उपलेखाशिर्षाच्या उपलब्ध तरतूदीमधून करण्यात येणार आहे. तसेच सदर महिलांच्या मुलांच्या कौशल्य प्रशिक्षण शुल्क / खर्चाची रक्कम + अतिरिक्त कर असे एकूण रक्कम ही महापालिका अंदाजपत्रकातील इतर कल्याणकारी योजनेच्या इतर योजना कार्यक्रम या उपलेखाशिर्षाच्या उपलब्ध तरतूदीमधून करणेत येणार आहे. त्यानुसार, पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील कोविड १९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे अचानक वैधव्य आलेल्या महिलांना व त्यांच्या मुला / मुलींना सिम्बॉयसिस ओपन ऍज्युकेशन सोसायटीकडील सोबतच्या प्रपत्रानुसार रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षण देणेस व याकामी सिम्बॉयसिस ओपन ऍज्युकेशन सोसायटी यांची नियुक्ती करणेस मान्यता देणेत यावी. तसेच याकामी अचानक वैधव्य आलेल्या महिलांना व त्यांच्या मुलींना कौशल्य प्रशिक्षणाच्या शुल्काची / खर्चाची रक्कम + अतिरिक्त कर असे एकूण रक्कम ही महापालिका अंदाजपत्रकातील महिला व बाल कल्याण योजनेच्या पंडित दिनदयाळ उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम या उपलेखाशिर्षाच्या उपलब्ध तरतूदीमधून करण्यास व सदर महिलांच्या मुलांच्या कौशल्य प्रशिक्षण शुल्क / खर्चाची रक्कम + अतिरिक्त कर असे एकूण रक्कम ही महापालिका अंदाजपत्रकातील इतर कल्याणकारी योजनेच्या इतर योजना कार्यक्रम या उपलेखाशिर्षाच्या उपलब्ध तरतूदीमधून करण्यास मा. स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १४ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १३/०१/२०२२ विभाग-नागरवस्ती विकास योजना

सुचक - मा.निर्मला गायकवाड अनुमोदक - मा.रेखा दर्शले

संदर्भ - मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नावियो/०२/कावि/४/२०२१, दि.०३/०१/२०२१.

विषय - टाटा स्ट्राईव्ह या संस्थेमार्फत महिला बचतगट, महिला, मुली व मुले यांच्या विविध कल्याणकारी योजनांच्या पार्श्वभूमीनुसार पुढील ५ वर्षासाठी करणेत येणा-या रोडमॅपबाबत.

विषय क्र.०२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले**.

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक - ०३

दिनांक - १३/०१/२०२२

सुचक - मा.निर्मला गायकवाड अनुमोदक - मा.रेखा दर्शले

संदर्भ - मा.निर्मला गायकवाड अनुमोदक - मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभाग, महिला व बालकल्याण योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील महिलांचा शारीरिक व मानसिक विकास होणेकरीता "योगाचे प्रशिक्षण" देणे गरजेचे आहे. तरी सदर योजनेचा महिलांना लाभ मिळावा या करिता '**ओम ग्रामणे इन्स्टिट्युट फॉर एज्युकेशनल एन्सलन्स'** ही संस्था इच्छुक आहे. या संस्थेकडुन तसे योगा प्रशिक्षकामार्फत प्रशिक्षण देणेकामी दररोज २ तास प्रमाणे ३० दिवस या कालावधी करिता प्रती लाभार्थी र.रु. ३०००/- (जीएसटी सह) या दरानुसार होणा-या प्रत्यक्ष खर्चास व प्रशिक्षण आदेश देणेकामी **ओम ग्रामणे इन्सिटीटयुट फॉर एज्युकेशनल एन्सलन्स** या संस्थेस दि.३१/०३/२०२३ पर्यंतच्या कालवधीसाठी मान्यता देत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सविता बाळकृष्ण खुळे)**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपलिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/१५/२०२२
दिनांक : १४/०१/२०२२



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**(विषय क्र. १ चे लगत)**

**मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नाविया/०६/कावि/१५४/२०२१, दि.२७/१२/२०२१**

प्रपत्र

Proposed Courses By Symbiosis Open Education Society for Pimpric Chinchwad Municipal Corporation

| Sr. No | Program | Duration (Month) | Total Hours | Min Qualification | Batch Size | Suitable for & Age Group | Venue | Infra/ Equip/ Consumables from Symbiosis | Course fee per Student | Infrastr. from PCMC | Timing |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Complete Tailoring Course (Basic Tailoring + Hospital Wear, Ladies Wear Making) | 1.5 | 100 | 7th Pass | 25 | Girls & Women (18 to 45) | PCMC / SSPU | Sewing machine 10, stool 10, Table 2, Sewing Kit 10 | 10000/- | Hall | All batches will run from 11 am to 4 pm on week days except CNC that will run from 2pm to 6 pm on weekends & propose two batches of every course to run simultaneously |
| 2 | Herbal soap, Sanitizer & Sanitary Pad Making | 1 | 75 | 7th Pass | 25 | Girls & Women (18 to 45) | PCMC / SSPU | Set up | 7000/- | Hall | |
| 3 | Home Care & House Work | 1 | 100 | 7th Pass | 25 | Girls & Women (18 to 45) | PCMC / SSPU | Kitchenware, Accessories | 7000/- | Hall | |
| 4 | Basic Beauty services | 1 | 60 | 10th Pass | 20 | Girls & Women (18 to 45) | SSPU (Week end) | Cutting & eye brow Chair 2, Hair dryer 10 | 7000/- | NA | |
| 5 | CNC Programmer and Maintenance | 2 | 180 | ITI / 12th Pass / Diploma | 20 | Girls & Boys (18 to 35) | Auto cluster / SSPU | Machinery | 22000/- | NA | |
| 6 | 3-D Printer Operator and Installer | 2 | 180 | ITI / 12th Pass / Diploma | 20 | Girls & Boys (18 to 35) | SSPU | Machinery | 22000/- | NA | |
| 7 | E-Vehicle Service Technician | 2 | 180 | | 25 | Girls & Boys (18 to 35) | SSPU | Vehicles, Tool Kits | 16000/- | NA | |

(अजय चारठाणकर)
उप आयुक्त,
नागरवस्ती विकास योजना विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.